**कालमर्यादा**

**शुध्दीपत्रक** क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४५४८/२०२०
कार्यालय जिल्हा परिषद,नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :-२७ जुलै, २०२०

प्रति,

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती --------------(सर्व)

विषय :- बदलीस पात्र व बदली अधिकार प्राप्त प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गनिहाय (सर्वसाधारण व अवघड क्षेत्र) प्रारुप यादया प्रसिध्दीबाबत.------- सर्वसाधारण बदल्या -२०२०

संदर्भ:- १) ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था -१४दि.२७/०२/२०१७
२) ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४६१७/प्र.क्र.५६७/आस्था -१४दि.१५/०२/२०१८
३) ग्राम विकास विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था –१४ दि.१५ एप्रील,२०१७ दि.१७ मे,२०१७, दि.३१ मे,२०१७
४) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/आस्था-३/प्र.क्र.१२-१७/३०९० दि.२९/०४/२०१७ ( अवघड क्षेत्राची घोषित यादी. ८६ गांवे)
५) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/आस्था-३/प्र.क्र.३५-१८/१५७० दि.०१/०३/२०१८ ( महिला शिक्षकांसाठी काम करण्यास प्रतिकुल अवघड क्षेत्राची घोषित यादी. ४९ गांवे)
६) ग्राम विकास विभागाचे शासन पूरकपत्र क्र.जिपब-४८१९/प्र.क्र.३७३/आस्था १४ दि.२८ मे,२०१९
७) कक्ष अधिकारी,ग्राम विकास विभाग,मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.२८२/आस्था-१४ दि.१५ जुलै, २०२०
८) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४३३०/२०२० दि.१६.०७.२०
९) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४३८१/२०२० दि.१७.०७.२०
१०) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४५११/२०२० दि.२४.०७.२०

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णये व शासन शुध्दीपत्रकान्वये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी सुधारीत धोरण निश्चित केलेले आहे. संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयातील परिच्छेद II) ३. मधील तरतूदीनुसार संदर्भिय पत्र क्र.१० अन्वये बदलीस पात्र प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गनिहाय (सर्वसाधारण व अवघड क्षेत्र) प्रारुप जेष्ठता यादया प्रसिध्द करण्यात आलेल्या आहे. सदर प्रारुप यादयांमधील दुरुस्तीसाठी संबधित शिक्षकांनी पंचायत समिती स्तरावर गट शिक्षणाधिकारी यांचे कडे दि.२७/०७/२०२० पर्यंत सबळ पुराव्यानिशी अर्ज करण्याबाबत कळविण्यात आलेले होते . **संदर्भ १ चे शासन निर्णयातील परिच्छेद II -३ मध्ये "सदर यादयांबाबत आक्षेप असल्यास यादया प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसात शिक्षणाकाऱ्यांकडे यादयांमधील दुरुस्तीसाठी संबधित शिक्षकास अर्ज करता येईल." अशी तरतूद आहे.** सदर तरतुदीनुसार दिनांक २७-०७-२०२० पर्यत अर्ज सादर करण्यास दिलेली **मुदत या पत्राव्दारे दिनांक ३०-०७-२०२० पर्यत पाढविण्यात येत आहे.** त्याअनुषंगानी सदर प्रारुप यादयांमधील दुरुस्तीसाठी **संबधित शिक्षकांनी पंचायत समिती स्तरावर गट शिक्षणाधिकारी यांचे कडे दि.३०/०७/२०२० पर्यंत पर्यंत सबळ पुराव्यानिशी अर्ज करावे.** विहित कालावधीनंतर प्राप्त अर्ज ग्राहय राहणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी. तसेच संबधित पंचायत समितीनी **प्राप्त अर्जाची पडताळणी करुन अर्ज व तद्संबधीचे कागदपत्रे दि.३१/०७/२०२० रोजी खास दुतामार्फत जिल्हा कार्यालयास सादर करावे.** व खास दुतांनी आपले समक्ष यादयांमध्ये दुरुस्ती करुन घ्यावी (प्राप्त अर्जावर यादीचा अनुक्रमांक नमुद करावा) संदर्भिय क्र.१० मधील इतर सुचना जशाच्या तशा लागू राहील.

**सदर प्रारुप यादया जिल्हा परिषद, नागपूर चे संकेतस्थळ www.nagpurzp.com या वेबसाईट वर सुध्दा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.** संबधित शिक्षकांनी वर नमुद संकेतस्थळाला भेट देऊन आपला सेवा तपशिल तपासून घ्यावा. **काही दुरुस्ती असल्यास वर नमुद केल्याप्रमाणे दि.३०/०७/२०२० पर्यंत गट शिक्षणाधिकारी कार्यालयाला लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.**

सबब, वरील प्रमाणे माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**( चिंतामण वंजारी )**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

Scanned with CamScanner

**प्रतिलीपी :-**

१) मा. अध्यक्षा,जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.
२) मा. उपाध्यक्ष,जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.
३) मा. सभापती,शिक्षण समिती,जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर
४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
५) मा.अतिरिक्त कार्यकारी अधिकारी,जि.प. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
६) मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

Scanned with CamScanner